**Mata 11.05.20**

# पोलिस करताहेत ज्येष्ठांना मदत

म. टा. प्रतिनिधी, पुणे



लॉकडाउनमध्ये शहरात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना त्वरित मदत मिळावी म्हणून पुणे पोलिसांच्या ज्येष्ठ नागरिक कक्षाकडून प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत ज्येष्ठ नागरिक कक्षाकडून शहरातील ११ हजार २०० ज्येष्ठ नागरिकांबरोबर वैयक्तिक पातळीवर संपर्क साधण्यात आला असून, त्यांची विचारपूस करण्यात आली आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना जाणवणाऱ्या समस्या सोडविण्यात येत असून, त्यांना जीवनावश्यक वस्तू, घरपोच डबा, औषधे पोहचविण्यात येत आहेत.

लॉकडाउनमध्ये काही अडचण आल्यास ज्येष्ठ नागरिकांनी त्वरित हेल्पलाइन क्रमांकावर (१०९०) संपर्क साधावा, असे आवाहन ज्येष्ठ नागरिक कक्षातील पोलिस निरीक्षक वैशाली चांदगुडे यांनी केले आहे. करोनाचा संसर्ग वाढीस लागला असून, ज्येष्ठ नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्येष्ठांनी घरात सुरक्षित रहावे, स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या संकल्पनेतून ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ नागरिक कक्षातील कर्मचारी कार्यरत आहेत. लॉकडाउनमध्ये १७९ गरजू ज्येष्ठ नागरिकांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले. त्यासाठी राउंड टेबल संस्था, आपुलकी फाउंडेशन, सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट, वंदेमातरम संघटना, वेस्टर्न युनियन कंपनी, स्वायरुटस् फुडस या संस्थांनी सहकार्य केले. लष्कर, वानवडी, हडपसर भागात ज्येष्ठांना चिवड्याच्या पाकिटांचे वाटप करण्यात आले.

**Pudhari 01.05.20**

# पोलिसांनी थेट सोसायटीत जाऊन केला मायराचा वाढदिवस साजरा

**विश्रांतवाडी : पुढारी वृत्तसेवा**

विश्रांतवाडी पोलिस स्टेशनच्या वतीने टिंगरेनगरमधील तिरुपती कॅम्पस सोसायटीमध्ये एक आगळावेगळा वाढदिवस साजरा करण्यात आला. मायरा दहीकर या लहान मुलीचा पाचवा वाढदिवस पोलिसांनी केक आणून व सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत साजरा केला. यावेळी सोसायटीमधील सर्वांनी टाळ्या वाजवून मायराला शुभेच्छा दिल्या.

तिरुपती कॅम्पस येथे राहणाऱ्या योगेंद्र दहीकर व राशी दहीकर यांच्या मायरा या कन्येचा आज (दि.३०) पाचवा वाढदिवस होता. मात्र लॉकडाऊनमुळे ती वाढदिवस साजरा करू शकत नव्हती. विश्रांतवाडी पोलिसांना समजल्यानंतर पोलिसांनी केक घेऊन सरळ टिंगरेनगरमधील तिरुपती कॅम्पस गाठले. तिला खाली बोलावून केक कापून तिचा वाढदिवस साजरा केला. पोलिसांनी गाडीत हॅपी बर्थ डेची धून लावली, तर सोसायटीमधील रहिवाशांनी गॅलरीमध्ये उभे राहून टाळ्या वाजवत मायराला शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलिस निरीक्षक रवींद्र कदम, उपनिरीक्षक नरळे, हवालदार देविदास राऊत, आनंद रासकर, सुशांत रणवरे, नितीन साबळे आदी उपस्थित होते.



विश्रांतवाडी पोलिसांनी केक कापून मायराचा वाढदिवस साजरा केला.

**Lokmat 19.05.20**

# बिबवेवाडी पोलिसांनी केले दिव्यांग तरुणीचे कन्यादान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात राहणाऱ्या बिबवेवाडी येथील तरुणीचा औरंगाबाद येथील दिव्यांग तरुणाशी सोशल डिस्टन्सिंगचे पालन करुन विवाह नुकताच पार पडला. यातील महत्त्वाची बाब म्हणजे बिबवेवाडी पोलिसांनी मुलीचे कन्यादान केले.

पोकळेवस्ती येथे राहणाऱ्या संतोष बामणे यांची रेवती नावाची कन्या असून तिचा विवाह औरंगाबाद येथील नामदेव खेमनर यांच्या मुलाशी ठरला. दोघेही मूक-बधिर आहेत. रविवारी महेश सोसायटी येथील दत्त मंदिरामध्ये विवाह सोहळा पार पडला. यावेळी बिबवेवाडी पोलीस ठाण्यातर्फे मुलीचे कन्यादान करण्यात आले. यावेळी मुलीकडील पाच आणि मुलाकडी पाच पाहुणे, तसेच बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी पाच जण उपस्थित होते. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असून त्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. संसर्ग होऊ नये, यासाठी नागरिकांनी घरातच राहावे, म्हणून पोलीस सतत आवाहन करीत आहेत. नागरिकांकडून त्यांना सहकार्यही मिळत आहे. अशातच पोलिसांकडून घेण्यात आलेल्या पुढाकारामुळे नागरिकांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत.

**Pudhari 16.05.20**

# कोरोनाच्या लढ्यात आता पोलिस अधिकाऱ्यांचे कुटुंबीयही

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या लढ्यात आता शहरातील पोलिस अधिकाऱ्यांचे कुटुंबीयदेखील सहभागी झाले आहेत. पुणे शहरात वास्तव्यास असलेल्या आजी व माजी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या पत्नींनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या 'आयपीएस ऑफिसर्स वाईव्ज ऑर्गनायझेशन, पुणे' (आयपीएसओडब्ल्यूओ)च्या माध्यमातून ते आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत आहेत. आतापर्यंत सात हजारांपेक्षा अधिक परप्रांतीय नागरिकांना पुण्यातून रेल्वेद्वारे त्यांच्या राज्यात पाठविण्यात आले आहे. या सर्व नागरिकांना प्रवासादरम्यान लागणाऱ्या जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून केला जात आहे. कोरोनाविरुद्धच्या लढ्यात आपल्या घरच्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांचे कुटुंबीयही साथ देत आहेत.

शहराचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या पत्नी डॉ. ममता या ऑर्गनायझेशच्या चेअरमन आहेत. त्यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या पत्नी स्मिता मोराळे यांच्यासह अन्य पदाधिकारी सक्षमपणे ही धुरा सांभाळत आहेत. गेल्या सात दिवसांपासून या सर्व जणी न थकाता हे अव्हान लीलया पेलत आहेत.

शहरातून जे परप्रांतीय मजूर आपल्या राज्यात जाणार आहेत त्यांच्या नावांची यादी मिळताच, प्रवास करणाऱ्या गर्भवती माता, लहान बाळे, छोटी मुले, वयोवृद्ध यांचा खास विचार करून प्रवासात वापरता येतील असे अमूल दुधाचे टेट्रा पॅकिट्स पोलिस कुटुंबीयांकडून आवर्जून देण्यात येत आहेत. या दूर पल्ल्याच्या प्रवासात ऊर्जा मिळावी यासाठी प्रत्येकाला दूध पॅकिटसोबत गुळाची ढेपही देण्यात येत आहे. आतापर्यंत सात हजार लोकांना मदत देण्यात आली आहे आणि यानंतर जाणाऱ्या दहा ते बारा हजार लोकांनाही मदत देण्यात येणार आहे.

पुणे शहरात राहणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांनी एकत्र येऊन या वस्तूंसाठी मदत करून खारीचा वाटा उचलला आहे. यात सेवानिवृत्त पोलिस अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांनीही योगदान दिले आहे. पोलिस कर्मचारी रोज रेल्वे स्टेशनवर जाऊन या सगळ्या सामानाचे वाटप करत आहेत. आलेले सामान उतरवून घेणे, ते त्या त्या गेटवर मांडून घेणे, त्याचे प्रत्येक प्रवाशाला वाटप करणे ही सगळी कामे पोलिस कर्मचारी स्वेच्छेने माणुसकीच्या भावनेतून करत आहेत.

Lokmat 19.06.20

# चांदणी चौकात आढळली सहा महिन्यांची बालिका

## वारजे वाहतूक पोलिसांनी दिले चिमुकलीला जीवदान

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्वेनगर : सायकांळी सव्वासहा वाजता चांदणी चौकातील एका झुडपात लहान बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. त्या आवाजाच्या दिशेने नागरीक गेले असता त्या ठिकाणी साधारण पाच ते सहा महिन्यांचे बाळ रडताना आढळले. बाळ सापडताच जवळच वारजे वाहतूक पोलीस सुजय पवार आणि सुरेश शिंदे उपस्थित होते.

पोलिसांनी बाळ ताब्यात घेऊन कोथरूड पोलिसांच्या ताब्यात दिले. वाहतूक पोलीस नसते तर हे बाळ भटक्या कुत्र्यांचे सावज झाले असते. या मुलीच्या मातापित्याचा रात्री उशीरा शोध लागला. आंबेगाव बुद्रुक येथील एका कुटुंबातील हे बाळ असून, घरात वाद झाल्याने ते सोडन दिल्याचे समजते.



या ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेरे चेक करण्यात आले. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काहीतरी जुनी दुश्मनी काढण्यासाठी या अर्भकाला येथे झुडपात आणून टाकले असण्याची शक्यता आहे. सर्व शक्यता तपासत पुढील तपास कोथरूड पोलीस करत आहेत.

– प्रतिभा जोशी,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक

Prabhat 24.06.20

# करत होता आत्महत्या; पोलिसांनी वाचवले प्राण

## मार्केटयार्ड येथील घटना

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - लॉकडाऊनमध्ये अनेक महिने घरात कोंडून राहिल्याने तसेच नोकरी, व्यवसायात नुकसान झाल्याने अनेकांना नैराश्याने ग्रासले असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांचे मत आहे. यातूनच वैयक्तिक किंवा आर्थिक कारणातून शहरात आत्महत्या होत आहेत. शहरात आत्महत्येचे सत्र सुरू असताना पोलिसांच्या तत्परतेमुळे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या एका तरुणाचे प्राण वाचले.

लॉकडाऊनमुळे कर्जबाजारी झाल्यामुळे आपण आत्महत्या करीत असल्याचे एका तरुण मित्राला सांगितले. मित्राने याची माहिती तातडीने पोलिसांना कळवली. मार्केटयार्ड पोलिसांनी तत्काळ धाव घेत संबंधित तरुणाचे समुपदेशन करीत त्याला नैराश्येतून बाहेरही काढले.



मार्केटयार्ड येथील हाईडपार्क येथे राहणारा मित्र आत्महत्या करण्याच्या तयारीत असल्याचा फोन पोलीस नियंत्रण कक्षाला रविवारी साडेदहाच्या सुमारास आला. त्यानंतर मार्केटयार्ड पोलीस ठाण्याच्या बीट मार्शलनी त्या ठिकाणी धाव घेत तो राहत असलेली सदनिका शोधली. दरवाजा वाजविला असता सुरुवातीला तो दरवाजा उघडत नव्हता. त्याला विनवणी व समजावून सांगत दरवाजा उघडण्यास भाग पाडले, त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर तो नैराश्येत असल्याचे तसेच आत्महत्या करणार असल्याचे समजले.

मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात त्या तरुणाला घेऊन आल्यानंतर चौकशी असता, त्याचा जुन्या गाड्या खरेदी विक्रीचा व्यवसाय होता. करोनामुळे व्यवसाय बंद पडला. काही व्यवहार अडकल्याने कर्ज वाढले होते. पैसे देणे असल्यामुळे संबंधितांचे दररोज फोन येत होते. आत्महत्या केल्यानंतर ही कटकट राहणार नाही, या विचारात असल्याचे त्याने सांगितले. त्यामुळे पोलिसांनी त्याच्या भावासोबत बसवून त्याचे समुपदेशन करीत तरुणास या विचारातून बाहेर काढले.

Lokmat 06.06.20

जावेद खान




**कर्तव्याबरोबरच वटपौर्णिमा... :** देशावर कोरोनारुपी आलेल्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी पोलीस, आरोग्य विभाग जीवाची बाजी लावत आहेत. महिला पोलीस, परिचारिका कर्तव्यात कोठेही कमी नाहीत. कर्तव्य पार पाडताना शुक्रवारी साताऱ्यात काहींनी वटसावित्री पौर्णिमाही साजरी केली.

Prabhat 06.06.20



**पुणे :** पोलिसांच्या कामाच्या व्यापामुळे त्यांना कसलीच उसंत मिळत नाही, करोनामुळे घरच्यांपासूनही त्यांना लांब राहावे लागत आहे. वटपौर्णिमेला वडाची पूजा करायची यासाठी थोडा वेळ काढून येरवडा पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पोलीस स्टेशनच्या आवारातील वडाच्या झाडाची पूजा केली